# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.11.2025** **वारःमंगळवार**

1. पारंपरिक बी-बियाणांच्या संवर्धनावर भर देण्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांचं आवाहन
2. राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठीच्या अर्जाची आज छाननी
3. आरक्षणाची 50 टक्के कमाल मर्यादा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओलांडता येणार नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा
4. राज्यातल्या 25 हजार सरपंचांसमवेत मुख्यमंत्र्यांनी साधला दूरस्थ माध्यमातून संवाद आणि
5. केंद्र सरकारकडून बिबट नसबंदीची मान्यता मिळाल्याची वनमंत्री गणेश नाईक यांची माहिती

**<u>बियाणे परिषद</u>**

पारंपरिक बी-बियाणांच्या संवर्धनावर भर देण्याचं आवाहन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केलं आहे. चौहान यांच्या हस्ते काल मुंबईत आशियाई बियाणे परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. निकृष्ट आणि अनधिकृत बीज विक्री नियंत्रणासाठी आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन बी बियाणे कायदा आणण्यात येणार असल्याचं चौहान यांनी सांगितलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. राज्यात पुढील दोन ते तीन वर्षांत 25 लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले…

**जे काही आमची बियाणं आहेत त्याच्यामध्ये ट्रेसेबिलिटी असली पाहिजे कारण अनेक वेळा आपल्याला पाहायला मिळतं की बियाणे उगवत नाहीत, क्रॉप फेलियर होतं. शेतकऱ्यांना खोट्या बियाण्यांना त्या ठिकाणी सामोरं जावं लागतं, नकली बियाण्यांचा सुळसुवाट असतो त्यामुळे ब्लॉकचेन पद्धतीनं पुढच्या काळामध्ये बियाण्यांचा सर्व व्यवहार झाला पाहिजे आणि त्या सोबत आज वातावरणातल्या बदलांचा जो शेतीवर परिणाम होतो आहे. त्या परिणामाचा विचार करून आपल्याला बियाण्यांच्या क्षेत्रामध्ये इनोव्हेशन आणलं पाहिजे आणि नवीन प्रकारची वाढ की जे क्लायमेट रेजिलियंट म्हणजे वातावरणातल्या बदलांचा जो परिणाम आहे त्या परिणामाला त्याचा सामना करू शकतील अशा प्रकारचं बियाणं आपल्याला तयार करता आलं पाहिजे.**

उदघाटन समारंभानंतर कृषी मंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रमस्थळी सुरु असलेल्या विविध स्टॉल्सना भेट दिली.

**<u>निवडणूक</u>**

राज्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याचा काल शेवटचा दिवस होता. आज या अर्जांची छाननी होणार आहे. त्यानंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर 19 ते 21 नोव्हेंबर या दरम्यान ज्या प्रभाग किंवा अर्जावर अपिल आहे असे सोडून इतर ठिकाणी अर्ज मागे घेता येतील. 26 नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे.

**सर्वोच्च निकाल**

दरम्यान, एकंदर आरक्षणावर असलेली 50 टक्क्यांची कमाल मर्यादा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये पाळावीच लागेल, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं काल दिला. बांठिया आयोगाच्या निष्कर्षांच्या आधारे या निवडणुकीत ओबीसी आरक्षण लागू करायच्या सरकारच्या निर्णयासंबंधीच्या याचिकांवर काल सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयानं हे निर्देश दिले.

**सरपंच संवाद**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल राज्यातील 25 हजार सरपंचांशी दूरस्थ माध्यमातून संवाद साधला. क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेनं तयार केलेल्या 'सरपंच संवाद' या डिजिटल मंचाच्या माध्यमातून या संवाद सत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. राज्यभरातील अनेक सरपंचांशी एकावेळी होत असलेल्या या सशक्त संवादातून, आपण निश्चितपणे समृद्ध राज्य आणि समृद्ध देश तयार करू, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. ग्राम विकासाशिवाय राज्याचा आणि देशाचा विकास होऊ शकत नाही, असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले की गावांच्या सर्वांगीण विकासासाठी सरपंच परिवर्तनकर्ते आहेत. सरपंचांची थेट निवडणूक ही परिवर्तनाची मोठी पायरी ठरल्याचं ते म्हणाले.

**राज्यपाल**

विद्यापीठांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गुणांकन पातळी सुधारण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काल केलं. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 आणि व्हिजन महाराष्ट्र 2047 या विषयावर मुंबईत राजभवन इथ आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, तसंच राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते.

**मुख्यमंत्री एनईपी**

दरम्यान याच विषया संदर्भातली एक आढावा बैठक काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाली. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मानांकन सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, यासाठी प्रत्येक विद्यापींठात डिजिटल देखरेख मंच तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

**नियुक्ती**

शासकीय सेवांमध्ये विविध पदांच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर किमान चार दिवसात संबंधित उत्तीर्ण उमेदवाराला नियुक्तीपत्र द्यावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. सुशासनासाठी प्रशासकीय सुधारणांबाबत आयोजित सादरीकरण बैठकीत ते बोलत होते. दरवर्षीचा आढावा घेत जानेवारी महिना संपेपर्यंत उपलब्ध पदोन्नतींच्या जागांनुसार 75 टक्के पदोन्नती देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

**बिबट नसबंदी**

मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासाठी कृत्रीम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर आणि जागतिक स्तरावरील सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात, अशा सूचना वनमंत्री गणेश नाईक यांनी काल दिल्या. मानव-बिबट संघर्ष उपाययोजनांबाबत पुण्यात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बिबट नसबंदी करण्याबाबत केंद्राची मान्यता मिळाली असून त्याबाबतची कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. सध्या बिबट्या पकडण्यासाठी असलेले दोनशे पिंजरे

आता वाढवून एक हजार करण्यात येणार आहेत. याशिवाय, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्यानं काही ठिकाणी कॅमेरे बसवले जाणार आहेत असं नाईक यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

**समाधी सोहळा**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा 729वा संजीवन समाधी सोहळा काल आळंदी इथं भाविकांच्या अलोट गर्दीमध्ये, भावपूर्ण वातावरणात पार पडला. पहाटे अडीच वाजता मंदिर समितीचे विश्वस्त निरंजननाथ महाराज यांच्या हस्ते ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीवर पवमान अभिषेक करण्यात आला आणि समाधी सोहळ्याच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली. नामदेव महाराजांच्या वंशजांच्या कीर्तनानंतर दुपारी बारा वाजता समाधीवर पुष्पवृष्टी होऊन हा सोहळा पार पडला.

**पुरस्कार**

संतकवी श्री दासगणू महाराज पुरस्कार वाराणसी इथले विद्वान वेदशास्त्रसंपन्न गणेश्वर शास्त्री द्रवीड यांना काल पंढरपूर इथं प्रदान करण्यात आला. श्री दासगणू महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यातील श्रीराधा दामोदर प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. वाराणसी इथल्या द्रविड शास्त्री यांच्या वेदपाठशाळेला शंभर वर्षांहून अधिक परंपरा आहे, याबाबत आकाशवाणीशी बोलताना गणेश्वरशास्त्री द्रविड म्हणाले....

**एकशे पाच वर्षांपूर्वी काशीला गंगेच्या काठी रामघाट स्थानात श्री वल्लभराव शालीग्राम सांगत विद्यालयाची स्थापना आमचे आजोबा धर्मपण लक्ष्मण शास्त्री द्राविड यांनी केलं. या कार्यात वडिलांचा जो शिष्य समुदाय होता त्यात महाराष्ट्रीय लोक अधिक होते आणि महाराष्ट्रात त्यातूनही लोक येत असतं. तिकडे शंकर महाराज खंदारकर, भगवान शास्त्री धारुरकर वगैरे वगैरे मोठी मंडळी होती. त्यामुळे येणं होत असे. तर धार्मिक संघटन या दृष्टीने महाराष्ट्रीय लोकांचा आणि काशीतल्या लोकांचा एक संघटन होतं. ते काय पुढे व्हायला पाहिजे.**

**गोपाळरत्न-कोल्हापूर**

पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागातर्फे दिला जाणारा राष्ट्रीय गोपाळरत्न पुरस्कार यंदा राज्यातल्या दोन दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना मिळाला आहे. देशी दुभत्या पशुंचे संगोपन करणाऱ्या सर्वोत्कृष्ट दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या श्रेणीत कोल्हापूरच्या अरविंद यशवंत पाटील आणि श्रद्धा धवन यांनी पुरस्कार पटकावले आहेत. अरविंद पाटील यांनी पहिला क्रमांक मिळवला असून श्रद्धा धवन यांना तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.

**लाडकी बहीण**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याची मुदत आता येत्या 31 डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी काल ही माहिती दिली. लाडकी बहीण योजनेतील ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आजपर्यंतची मुदत होती; मात्र काही जिल्ह्यांमध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

**कुष्ठरोग अभियान**

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कालपासून कुष्ठरोग रुग्णशोध अभियानाची सुरुवात झाली आहे. या अभियानात एक कोटीपेक्षा जास्त घरं सर्वेक्षणासाठी निवडली असून त्यातील 8 कोटी 66 लाख लोकसंख्येची तपासणी करण्याचं

उद्दिष्टय आहे. ही मोहीम 2 डिसेंबरपर्यंत चालणार आहे. सर्व सरकारी आरोग्य यंत्रणेमार्फत कुष्ठरोगावरील उपचार पूर्णपणे मोफत उपलब्ध असल्याचं आरोग्य विभागानं म्हटलं आहे.

**अभिवादन**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या तेराव्या स्मृतिदिनानिमित्त काल त्यांना राज्यात अभिवादन करण्यात आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्याच्या आनंदआश्रमात बाळासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन केलं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह ठाकरे कुटुंबीयांनी मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळावर पुष्पांजली अर्पण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही समाज माध्यमावर बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केलं आहे.

**दिल्ली- बॉम्बस्फोट**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएनं काल श्रीनगरमधून जसीर बिलाल वनी याला अटक केली. या बॉम्बस्फोटासाठी वनी यानं तांत्रिक मदत केल्याचं एनआयएनं म्हटलं आहे.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा कडाका वाढला आहे. येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.